**इयत्ता: दहावी** पहिली घटक चाचणी **विषय: इतिहास व राज्यशास्त्र**

**गुण: 20** **वेळ: 1 तास**

## इतिहास

**प्रश्न 1 अ: रिकाम्या जागा भरा.** **(2 गुण)**

(*i*) 'आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज' हा ग्रंथ याने लिहिला. (सप्टें. '२२)

(अ) कार्ल मार्क्स (ब) मायकेल फुको (क) लुसिआँ फेबर (ड) व्हॉल्टेअर

(*ii*) भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे ..... हे पहिले सरसंचालक होत. (मार्च २२)

(अ) अलेक्झांडर कनिंगहॅम (ब) विल्यम जोन्स (क) जॉन मार्शल (ड) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

**प्रश्न 1 ब: चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा** **(२ गुण)**

(*i*) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल -रिझन इन हिस्टरी

(२) लिओपॉल्ड व्हॉन रांके - द थिअरी ॲण्ड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी

(३) हिरोडोटस - द हिस्टरीज

(४) कार्ल मार्क्स -डिसकोर्स ऑन द मेथड

(*ii*) हू वेअर द शूद्राज - वंचितांचा इतिहास

(२) स्त्री-पुरुष तुलना - स्त्रीवादी लेखन

(३) द इंडियन वॉर ऑफ इन्डिपेन्डन्स १८५७ - मार्क्सवादी इतिहास

(४) जेम्स ग्रँट डफ - वसाहतवादी इतिहास

**प्रश्न 2: टीपा लिहा. (कोणतीही 1)** **(2 गुण)**

(*i*) भारतीय स्त्रीवादी इतिहासलेखन.

(*ii*) ॲनल्स प्रणाली

**प्रश्न 3: शास्त्रीय कारणे लिहा. (कोणतेही 2)** **(4 गुण)**

(*i*) तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो

(*ii*) प्रादेशिक इतिहासलेखनाला चालना मिळाली

(*iii*) व्हॉल्टेअर यांना 'आधुनिक इतिहासलेखनाचे जनक' असे म्हटले जाते.

**प्रश्न 4: सविस्तर उत्तर लिहा (कोणतेही 1)** **(३ गुण)**

(*i*) कार्ल मार्क्स यांचा वर्गसिद्धान्त स्पष्ट करा.
(*ii*) नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या प्रकल्पांतून कोणत्या गोष्टी साध्य होतात?

## राज्यशास्त्र

**प्रश्न 5: रिकाम्या जागा भरा** **(२ गुण)**

(*i*) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी _____ टक्के जागा आहेत

(अ) 25 (ब) 30 (क) 40 (ड) 50

(*ii*) निवडणूक आयुक्तांची नेमणूक कोण करतात?
(अ) राष्ट्रपती (ब) प्रधानमंत्री

(क) लोकसभेचे सभापती (ड) उपराष्ट्रपती

**प्रश्न 6: संकल्पना स्पष्ट करा (कोणतीही एक)** **(२ गुण)**

(*i*) माहितीचा अधिकार
(*ii*) मध्यावधी निवडणुका

**प्रश्न 7: सविस्तर उत्तरे द्या (कोणताही 1)** **(३ गुण)**

(*i*) 'निवडणूक आचारसंहिता' म्हणजे काय हे स्पष्ट करा
(*ii*) मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्यामुळे कोणते परिणाम झाले?